माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ अमरावती

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

## अपील क्रमांक :- २०६०/२०१९

**अपिलार्थी :- श्री. सुभाष यादवराव चिमूरकर,**
**मु.प्लॉट नं १८ व २५ पांजरा, पोस्ट कोराडी, त.कामठी जि.नागपूर**

**विरुध्द**

**उत्तरार्थी :- १. जन माहिती अधिकारी तथा, प्रबंधक,**
**अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती, ता.जि.अमरावती**

**२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ संशोधन अधिकारी,**
**अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती, ता.जि.अमरावती**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक :- २९.०१.२०२६**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास दिलेल्या पत्राचा दिनांक | प्रथम अपील अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १८.०३.२०१९ | २४.०४.२०१९ | २५.०४.२०१९ | निरंक |

१. अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये **दि.३१.०७.२०१९** रोजी **जोडपत्र-क** या नमुन्यात आयोगाचे स्तरावर द्वितीय अपील अर्ज दाखल केला. सदर अपील दाखल करण्याच्या प्रयोजनामध्ये "पडताळणी समिती मार्फत निर्गमित केलेल्या अनु. जमाती ०८ उमेदवारांच्या वैधता प्रमाणपत्राच्या नस्ती फोटोप्रती सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित अनु. जमाती उमेदवारांच्या वैधता प्रमाणपत्रांच्या नस्तीचा फोटो", असे नमूद केले आहे.

१. सदर सुनावणीस अपिलार्थी व्हिडिओ कॉन्फरन्सव्दारे उपस्थित झालेत आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.टी.एन.मनवर, तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.एस.जी.चौहाण तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्रीमती चंद्रलेखा पोलेवार उपस्थित आहेत.

२. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) नुसार अपीलार्थी यांनी **दि.१८.०३.२०१९** रोजी **जोडपत्र - अ** या नमुन्यात जन माहिती अधिकारी यांचेकडे रीतसर अर्ज दाखल करुन त्यामध्ये "१) आपले कार्यालयाचे वतीने निर्गमित केलेल्या ०८ उमेदवारांचे अनुसूचित जमाती वैधता प्रमाणपत्रांच्या नावाची यादी ज्यामध्ये संपूर्ण नाव, तालुका, जिल्हा, जमातीचे नाव, वैधता प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक तसेच केस क्रमांक नमुद करून या पत्रासोबत जोडून देण्यात येत आहे. त्या सर्व उमदवारांनी वैधता प्रमाणपत्राकरीता आपणाकडे सादर केलेल्या संपूर्ण कागदपत्रांच्या फोटो प्रती साक्षांकित करून कृपया पुरविण्यात याव्यात. २) आपले कार्यालयामार्फत पोलीस दक्षता पथकाच्या मागविण्यात आलेल्या अहवालाची

प्रत तसेच कार्यालयीन टिपणी त्यात समिती मधील सर्व सदस्यांची सही व शेरा नमुद केलेले आहे त्याबाबतच्या प्रती कृपया पुरविण्यात याव्या" अशी माहिती मागितली होती.

३. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र.१६३२, दि.२४.०४.२०१९ अन्वये अपिलार्थीस "कार्यालयामध्ये जवळ जवळ एक महिन्यापासून शासन आदेशानुसार सर्व नस्तीचे स्कॅनिंग व डिजिटायझेशनचे काम सुरु आहे. त्यामुळे सर्व नस्ती विखुरलेल्या स्थितीत आहे. आपण माहिती मागितलेल्या नस्तीचा शोध घेणे सुरु आह. नस्ती प्राप्त झाल्यावर संबंधीत माहिती अधिकार नियम क्र. ११ (१) अन्वये त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे संबंधितास माहिती द्यावी किंवा कसे याबाबत विचारणा करण्यात येईल, त्यानंतर आपणास माहिती पुरविण्यात येईन. करिता आपला अर्ज तूर्तास निकाली काढण्यात येत आहे" असे कळविले.

४. मात्र अपिलार्थीला अभिप्रेत माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थी यांनी व्यथित होवून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (१) नुसार **दि.२५.०४.२०१९** रोजी **जोडपत्र-ब** मध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल करुन त्यामध्ये "उमेदवारांच्या नस्तीचे कागदपत्रे न मिळाल्यामुळे" असे नमूद केले आहे.

५. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१९.१२.२०१६ रोजी प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन, "मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपिठ, नागपुरच्या पूर्ण पिठाने याचिका क्रमांक ५२९७/२०१३ मध्ये दि.२२.१२.२०१४ रोजी पारित केलेल्या आदेशाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिकेची प्रत मागीतलेली आहे, सदर माहितीचे स्त्रोत हे कार्यालय नसल्याने सदर माहिती ही अपिलकर्ते यांना पुरविणे अपेक्षित नाही. तरीदेखील विशेष अनुज्ञा याचिकेची प्रत या कार्यालयात उपलब्ध नसूनही माहिती ई-मेल व्दारे सदरहु विशेष अनुज्ञा याचिकेची प्रत मागीतली असता त्यातील सुरुवातीची काही पाने गहाळ आहेत त्यामुळे अपिलकर्ते यांना सदरहु प्रत जशी आहे तशी हवी असल्यास त्यांनी विहित शुल्क जमा करुन माहिती घेऊन जावी" असे आदेश पारीत केले. या सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

६. व्दितीय अपिलाच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी यांनी सांगीतले की, त्यावेळेला अभिलेखांचे स्कॅनिंग सुरु होते व नंतर कोविड सुरु झाला, तसेच ही माहिती ही त्रयस्थ पक्षाची असल्याने देता आली नाही. त्यावर अपिलार्थीनी सांगीतले की, त्यांना नागपूर आयोगाने अशाच प्रकरणामधील माहिती देण्याबाबतचे आदेश दिलेले आहेत.

७. या प्रकरणातील विषयाच्या अनुषंगाने अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांचतर्फे किती प्रकरणामध्ये प्रमाणपत्राची छाननी करण्यात आली व त्यावेळेस पोलीस दक्षता पथकाची मदत घेतली, त्यातील किती प्रकरणात पोलीस दक्षता पथकाचा कोणत्या प्रकारचा अहवाल प्राप्त झाला, याची माहिती ही सार्वजनिक हितार्थ असून त्याची माहिती नागरीकांना मिळणे आवश्यक आहे. किंबहुना सदर माहिती अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती नागपूर यांनी कलम ४ (१) (ख) नुसार स्वंयस्फुर्तीने त्यांच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणे अपेक्षित आहे. त्यामुळे वरील माहिती ही त्यांनी त्यांच्या संकेतस्थळावर विनामुल्य प्रदर्शित करण्याबाबत पाऊले उचलणे आवश्यक आहे. केवळ सन २०११ ते २०१९ पर्यंतची नाही तर अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती संदर्भात प्रत्येक महसूली विभागात जिल्हानिहाय अशा प्रकरणाची संख्या, निर्गमित करण्यात आलेले वैधता प्रमाणपत्र, नाकारण्यात आलेल्या प्रमाणपत्राची संख्या, करण्यात आलेली प्रशासकीय प्रक्रिया, या बाबतीतील संपूर्ण माहिती संकेतस्थळावर विनामुल्य उपलब्ध करुन देणे या प्रक्रियेच्या पारदर्शकतेसाठी आवश्यक आहे. त्यामुळे अपिलार्थी यांचे व्दितीय अपील मंजूर करीत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र-अ नुसार सदर आदेश प्राप्त होताच ४ आठवड्याच्या आत अपिलार्थीस माहिती विनामुल्य प्रदान करण्यात यावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी.

वरील आदेशाची एक प्रत मा. सचिव, आदिवासी विभाग, मंत्रालय मुंबई तसेच मा. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडे योग्य त्या प्रशासकीय कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात येत आहे. तसेच मा. मुख्य सचिव, मंत्रालय मुंबई, महाराष्ट्र शासन यांच्या माहितीस्तव वरील आदेशाची एक प्रत पाठविण्यात येत आहे.

**आदेश**

उपरोक्त आदेशाच्या अधीन राहून, अपील निकाली काढण्यात येत आहे.

(रविंद्र ठाकरे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, अमरावती.**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २९.०१.२०२६**

जावक क्रमांक १११८ दिनांक 17 FEB 2026